स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम/माध्य.परीक्षा/ 3089

दिनांक - 31/01/2023

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चित्रकला प्रस्ताव सादर करण्याबाबत..**

**संदर्भ :-** १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६ /प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७

२. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिओओ/ २०२२ /चार ५२४ दि.२९/१२/२०२२ चे पत्र

३. राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ ०४७३ दि.२७/०१/२०२३ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय क्र.०१ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभाग होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव दि.१५ जानेवारी पर्यंत शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यात यावेत असे नमूद आहे.

तथापी संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२२ चा निकाल दि.१६/०१/२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे. मार्च २०२३ परीक्षेसाठी चित्रकला गुण प्रस्ताव सादर करण्याची मुदत दि.३१/०१/२०२३ देण्यात आलेली आहे.

तसेच संदर्भीय पत्र क्र. ०३ नुसार चित्रकला प्रस्तावासोबत एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित आहे परंतु सन २०२१ परीक्षेचे प्रमाणपत्र तांत्रिक कारणास्तव डॉऊनलोड करता आले नसल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. अशा प्रकरणी केंद्राकरीता कला संचालनालयाकडून प्राप्त झालेले दुय्यम निकालपत्रक केंद्रप्रमुखांनी प्रमाणित केले असल्यास ग्राह्य धरण्यात येईल. परंतु सदर कार्यपध्दती फक्त मार्च २०२३ परीक्षेपुरतीच लागू असणार आहे याची नोंद घ्यावी.

31/01

विभागीय सचिवांकरीता,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर